# University of Mumbai

दुरध्वनी क्र : 022-22618987
022-22708738

[illegible]
फोर्ट,
मुंबई - ४०००३२.


क्र.सांख्यिकी / MIS / १२२ / 189 २०१५

परिपत्रक :-

विषय : व्यवस्थापकीय माहिती पध्दत (एम.आय.एस.) सन २०१५–१६ वेबपोर्टलवर माहिती भरणेबाबत.

संदर्भ : क्रमांक अशिसं/सांख्यिकी/एम.आय.एस/२०१५–१६/९४८३, दिनांक २८ सप्टेंबर, २०१५.

महोदय,

मुंबई विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य , संचालक व संस्था यांचे मा. शिक्षण संचालक उच्च शिक्षण पुणे यांच्या पत्राकडे लक्ष वेधु इच्छितो की -

राज्यातील उच्च शिक्षणबाबचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाची सांख्यिकी माहितीची मॅनेजमेंट इंफॉरमेशन सिस्टिम ( MIS) अत्यंत आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व इतर नॉन एआयसीटीई अभ्यासक्रम शिकविणा-या महाविद्यालयांकडून ऑनलाईन पध्दतीने विवरणपत्रांमध्ये माहिती मागविण्यात येत आहे.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत सहसंचालक कार्यालय, विद्यापीठे आणि महाविद्यालये यांचेकरिता प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेत्तर बाबींच्या ऑनलाईन माहिती नोंदणीकरिता www.dhemis.maharashtra.gov.in या वेबपोर्टलवर माहिती नोंदणीची लिंक विकसित केलेली आहे. तरी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ या वर्षाकरिता संबंधित आवश्यक असलेली माहिती संचालनालयास देणे अत्यावश्यक आहे.

त्याकरिता संलग्नित महाविद्यालये, संस्था यांनी उच्च शिक्षण संचालनालय यांना संबंधित माहिती सादर करण्यासाठी www.dhemis.maharashtra.gov.in या वेबसाइट वर जाऊन व तेथे उपलब्ध असलेल्या विविरण पत्रामध्ये संकलित करणे आवश्यक आहे. तसेच ती माहिती वेबपोर्टलवर संकलित करीत असताना काही अडचणी किंवा त्रुटी आढळल्यास दुरध्वनी– 022-22618987 / 022-22708738 या क्रमांकावर त्वरीत संर्पक साधणे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता आपणास असे सुचित करण्यात येते की, संचालनालयास अपेक्षित असलेली संबंधित माहिती नोंदणीचा कार्यक्रम **दिनांक १/१०/२०१५** पासुन चालू झाला असुन ती माहिती **दिनांक १५ /१०/२०१५** पर्यंत शासन आदेशानुसार पुर्ण करावयाची असल्या-कारणाने त्या माहितीचा संपुर्ण एकत्रित अहवाल शासनांस **दिनांक १०/११/२०१५** पर्यंत सादर करण्यात येणार आहे.

**तरी संचालनालयास संबंधित आवश्यक असलेली माहिती दिनांक १५/१०/२०१५ पर्यंत आपणाकडुन ऑनलाईन पध्दतीने विहित विवरणपत्रांमध्ये माहिती तात्काळ भरून पाठवावी. ती माहिती पाठविण्यास आपल्याकडुन विलंब झाल्यास होणा-या शासन कारवाईस संस्थेचे जबाबादार या नात्याने आपणास सामोरे जावे लागेल, याची नोंद घ्यावी.**

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ~~१~~ ०५ आक्टोंबर, २०१५

उपकुलसचिव
(जनसंपर्क विभाग/सांख्यिकी कक्ष/प्रकाशन विभाग)